# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.09.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

**. टाटा एडव्हान्स सिस्टिम्स लिमिटेडच्या मोरोक्कोमधल्या संरक्षण उत्पादन कारखान्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन**

**. दिवाळी आणि छठ पूजा या सणांच्या काळात 12 हजार विशेष गाड्या चालवण्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा**

**. महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे अनेक ठिकाणी शेती आणि पशुधनाचं नुकसान, आतापर्यंत 1 हजार 829 कोटींची मदत शेतकऱ्यांना दिल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती**

**आणि**

**. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान**

**आता सविस्तर बातम्या**

**राजनाथ मोरोक्को**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि त्यांचे मोरोक्कोचे समपदस्थ अब्देलतीफ लौद्यी यांनी काल मोरोक्कोमधल्या बेरेचिड इथल्या टाटा एडव्हान्स सिस्टिम्स लिमिटेडच्या संरक्षण उत्पादन कारखान्याचं संयुक्तरीत्या उद्घाटन केलं. या कारखान्याचं उद्घाटन हा भारत आणि मोरोक्को यांच्यात सामरिक भागीदारी विकसित होण्याच्या दृष्टीनं ऐतिहासिक क्षण असल्याचं राजनाथ सिंह यावेळी बोलताना म्हणाले. या कारखान्यात TASL आणि डीआरडीओ यांनी संयुक्तपणे डिझाईन केलेल्या चाकांसह चिलखती प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात येणार आहे. हा मोरोक्कोमधला सर्वात मोठा कारखाना असून भारतीय खासगी कंपनीनं आफ्रिकेत सुरू केलेला अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प आहे.

**वैष्णव रेल्वे**

लवकरच येऊ घातलेल्या दिवाळी आणि छठ पूजा या मोठ्या सणांच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी १२ हजार विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार असल्याची घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. काल नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत वैष्णव यांनी ही घोषणा केली. दोन  वंदे भारत स्लीपर ट्रेन्सही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती वैषणव यांनी यावेळी दिली. या दोन स्लीपर ट्रेन्सपैकी एका गाडीच्या सर्व चाचण्या यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.  तर दुसऱ्या गाडीच्या चाचण्या पुढील महिन्याच्या मध्यापर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले.

**शिवराज-डाळी**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी उत्तर प्रदेश आणि गुजरात या दोन राज्यांमधून प्रमुख डाळी आणि तेलबियांच्या खरेदीला मंजुरी दिली आहे. यामध्ये दोन्ही राज्यांमधून उडीद, तूर,मूग या डाळींच्या  पूर्ण खरेदी सोबतच तीळ, भुईमूग आणि सोयाबीन या तेलबियांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. त्यासाठी अंदाजे १३ हजार आठशे कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. ही पूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक, डिजिटल आणि शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून पार पाडण्याची गरज चौहान यांनी काल त्यांच्या अध्यक्षतेखाली दूरस्थ पद्धतीनं झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत व्यक्त केली. या उपक्रमाचा लाभ केवळ खऱ्या शेतकऱ्यांनाच व्हावा यावर त्यांनी भर दिला तसंच याचा अडते किंवा मध्यस्थांकडून गैरफायदा घेतला जाऊ नये असे निर्देश चौहान यांनी या राज्यांना दिले. ही खरेदी प्रक्रिया पोर्टलद्वारे  ई-समृद्धी आणि ई-संयुक्ती या पोर्टलच्या माध्यमातून पूर्णपणे डिजिटल पद्धतीनं केली जाणार आहे.

**महाराष्ट्र नुकसान**

महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे अनेक ठिकाणी शेती आणि पशुधनाचं नुकसान झालं आहे. नुकसान झालेल्या भागातल्या शेतकऱ्यांना मदत करण्याचे शासन आदेश दिले असून आतापर्यंत १ हजार ८२९ कोटींची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उर्वरित रक्कम येत्या दहा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.पुरामुळे स्थलांतरित व्हावं लागलेल्या नागरिकांसाठी सर्व व्यवस्था सरकार पुरवत आहे. सर्व पालकमंत्र्यांना पूरग्रस्त भागांना भेटी देण्याचे निर्देश दिले आहेत असं त्यांनी सांगितलं. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका मराठवाड्यातल्या जिल्ह्यांना बसला आहे.मुसळधार पाऊस आणि धरणातून होत असलेला विसर्ग यामुळे तेरणा नदीला आलेल्या पुरामुळे लातूर जिल्ह्याच्या औसा तालुक्यातील गाव बाधित झालं असून अनेक घरं

पाण्याखाली गेली आहेत. या घरात राहणाऱ्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. पुराच्या पाण्यामुळे लातूर-सोलापूर महामार्ग अंशतः बंद ठेवण्यात आला होता.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात**

**बाईट**

सरकारनं कृषी क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. आता ट्रॅक्टरचे टायर आणि सुट्या भागांवरील जीएसटी 18% वरून 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. याबाबत  महाराष्ट्रातील शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते हरी दत्तू पाटील यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया--
बाईट

**जीएसटी सुधारणा आरोग्य**

वस्तू आणि सेवा करातील नव्या सुधारणांमुळे अप्रत्यक्ष कर प्रणाली सुटसुटीत होण्यात मदत झाली आहे. सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारनं आरोग्य क्षेत्रासाठीचा जीएसटी बराच कमी केला आहे. पूर्वी १८ टक्के जीएसटी लागू असलेल्या आरोग्य सेवा आणि विमा करमुक्त करण्यात आले आहेत. यामुळे आरोग्यविमा घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन मध्यमवर्गीयांच्या वैद्यकीय खर्चात अप्रत्यक्ष घट होईल. कर्करोगासह अन्य गंभीर आजारांवरील ३३ जीवरक्षक औषधं पूर्णपणे करमुक्त करण्यात आली आहेत. इतर काही औषधं आणि विविध प्रकारच्या वैद्यकीय साहित्यावरचा जीएसटी १२ टक्क्यावरुन कमी करुन ५ टक्के करण्यात आला आहे.  या निर्णयामुळे लोकांचा आरोग्यसेवेसाठीच्या खर्चाचा आर्थिक ताण कमी झाला आहे.

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मुंबई**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतील विज्ञान भवनात  ७१व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले. मल्याळी अभिनेता 'मोहनलाल' यांना चित्रपट क्षेत्रातल्या अमूल्य योगदानासाठी दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आलं. सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'ट्वेल्थ फेल' या चित्रपटाला तर सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार  'रॉकी और रानी की प्रेमकहानी' या सिनेमाला मिळाला. शाहरूख खान याला त्याच्या 'जवान' या चित्रपटातील भूमिकेसाठी आणि विक्रांत मस्सी याला 'ट्वेल्थ फेल' साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार 'मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे' या सिनेमातल्या भूमिकेसाठी राणी मुखर्जी यांना प्रदान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणासाठी 'आत्मपँफ्लेट' या मराठी

चित्रपटाचे दिग्दर्शक आशिष बेंडे यांना सुवर्ण कमळ मिळालं. तर ‘श्यामची आई’ हा मराठीतला सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला.

**भारत पाक**

पाकिस्तान भारताविरुद्ध निराधार आणि प्रक्षोभक निवेदनं देऊन संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगाच्या व्यासपीठाचा गैरवापर करत असल्याबद्दल भारतानं पाकिस्तानवर तीव्र शब्दात टीका केली आहे. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या ६० व्या अधिवेशनात जीनिव्हा येथील संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे  स्थायी राजदूत क्षितीज त्यागी यांनी,  पाकिस्ताननं भारतीय भूभाग बळकावण्याऐवजी तो खाली करून  मरणासन्न अवस्थेत असलेल्या आपल्या अर्थव्यवस्थेला या अवस्थेतून बाहेर काढण्यावर लक्ष केंद्रित करावं अशा शब्दात सुनावलं. दहशतवाद्यांची निर्यात, संयुक्त राष्ट्रसंघानं दहशतवादी घोषित केलेल्यांना आश्रय देणं आणि आपल्याच नागरिकांवर बॉम्ब हल्ले करण्यातून कधी तरी वेळ काढावा अशी बोचरी टीकाही त्यागी यांनी केली.

**ट्रम्प युक्रेन**

नाटो आणि अमेरिकेच्या मदतीनं युक्रेन रशियाकडून आपला सर्व भूभाग परत जिंकू शकतो असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. आपण आता लष्करी आणि आर्थिक परिस्थिती पूर्णपणे समजून घेण्यास सुरुवात केली असून रशिया म्हणजे प्रचंड आर्थिक समस्या असलेला कागदी वाघ आहे असं मत ट्रम्प यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात व्यक्त केलं आहे. युद्धभूमीवर आपल्या छोट्याशा शेजारी देशाला हरवण्यात रशियला अपयश आल्याची  टीकाही त्यांनी केली आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोल्दोमीर झेलेन्स्की यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर ट्रम्प यांनी आपली भूमिका बदलली. या भूमिकेचं झेलेन्स्की यांनी स्वागत केलं आहे. दरम्यान,संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेसाठी जमलेले युरोपिय नेते मात्र ट्रम्प यांच्या नव्या वक्तव्याच्या अर्थाबाबत संभ्रमावस्थेत आहेत.

**डिकी बर्डनिधन**

विख्यात क्रिकेट पंच हॅरॉल्ड डिकी बर्ड यांचं काल साऊथ यॉर्कशर इथं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. क्रिकेटच्या इतिहासातले सगळ्यात लोकप्रिय आणि अचूक निर्णय देणारे पंच असा त्यांचा लौकिक होता. १९७३ ते १९९६पर्यंतच्या कारकीर्दीत त्यांनी ६६ कसोटी, ६९ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामने आणि ७ महिला एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिलं.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

. टाटा एडव्हान्स सिस्टिम्स लिमिटेडच्या मोरोक्कोमधल्या संरक्षण उत्पादन कारखान्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन

. दिवाळी आणि छठ पूजा या सणांच्या काळात 12 हजार विशेष गाड्या चालवण्याची रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची घोषणा

. महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे अनेक ठिकाणी शेती आणि पशुधनाचं नुकसान, आतापर्यंत 1 हजार 829 कोटींची मदत शेतकऱ्यांना दिल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

आणि

. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**